86

क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/६५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व सी-१५
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २८ ऑगस्ट, १९९२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ११ ऑगस्ट, १९९२ रोजी झालेल्या ६५व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
28/8/92

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :

शासनाचे सचिव [२],
नगर विकास विभाग,
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

प्राधिकरणाचे अधिकारी

No. BMRDA/MTG/65.

BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos. C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East),
BOMBAY - 400 051.

Date : 28th August, 1992.

The minutes of the 65th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 11th August, 1992 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S. V. Asgaonkar 28/8/92
( S. V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To :

All Members.

INVITEE :

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :

The Legal Adviser, B.M.R.D.A.

The Officers of B.M.R.D.A.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
६५व्या बैठकीचे कार्यवृत्त

<u>दिनांक</u> : ११ ऑगस्ट, १९९२ (मंगळवार)

<u>वेळ</u> : सकाळी 10.30 वाजता

<u>सभास्थान</u> : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष (खो.क्र. ३१३) तिसरा मजला, मंत्रालय.

<u>उपस्थित सदस्य</u> :

| | | |
|---|---|---|
| श्री. वसंत चव्हाण,<br>नगर विकास मंत्री | – | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान,<br>गृहनिर्माण मंत्री | – | सदस्य |
| श्री. रामचंद्र ता. कदम,<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगर पालिका | – | सदस्य |
| श्रीमती नीता अश्विन नाईक,<br>नगरसेविका,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका. | – | सदस्या |
| श्री. श. गं. काळे,<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ<br>शासनाचे सचिव (१)<br>नगर विकास विभाग. | – | सदस्य |
| श्री. नवीन कुमार,<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | – | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा,<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको. | – | सदस्य |
| श्री. पी. सुब्रहमण्यम,<br>महानगर आयुक्त | – | सदस्य-सचिव |

गणपूर्ती न होऊ शकल्याने (२ अशासकीय सदस्यांची उपस्थिती नसल्यामुळे) बैठक स्थगित झाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (बैठकीचे कामकाज) विनियम, १९७५ मधील नियम १२ खालील तरतूदीनुसार अर्ध्या तासानंतर सभा घेण्याचे ठरले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
तहकूब झालेल्या ६५व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ११ ऑगस्ट, १९९२ (मंगळवार) |
| वेळ | : | सकाळी ११.०० वाजता |
| सभास्थान | : | मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष (खो.क्र. ३१३) तिसरा मजला, मंत्रालय. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. वसंत चव्हाण, नगर विकास मंत्री | - | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान, गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| श्री. रामचंद्र ता. कदम, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्रीमती नीता अश्विन नाईक, नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्या |
| श्री. सुभाष मयेकर, नगरसेवक बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. रा. रा. सिंह, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. श. गं. काळे, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ, शासनाचे सचिव (१) नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. नवीन कुमार, शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग. | - | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा, व्यवस्थापकीय संचालक, सिडको | - | सदस्य |
| श्री. पी. सुब्रह्मण्यम, महानगर आयुक्त | - | सदस्य-सचिव |

प्रारंभी अध्यक्षांनी, श्रीमती नीता अरविंद नाईक, नगरसेविका, श्री. सुभाष मयेकर, नगरसेवक व श्री. रा. रा. सिंह, नगरसेवक यांचे प्राधिकरणाचे नवे सदस्य म्हणून स्वागत केले.

तसेच शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग म्हणून नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहीलेले श्री. नवीन कुमार यांचेही स्वागत केले.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [६४व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [६४व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही.

बाब क्र. ६ म्हणजे "मेसर्स मुकंद आयर्न अ‍ॅण्ड स्टील लिमिटेड [आता मुकंद लि. म्हणून पुनर्नामित] यांनी पवई येथे धारण केलेल्या जमिनीबाबत शासनाच्या नगर विकास विभाग आणि जमीनधारक मे. मुकंद लि. यांच्याशी त्रिपक्षीय करार करण्यास मान्यता" याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाचा विचार करताना प्राधिकरणाने अशी इच्छा व्यक्त केली की, सचिव-१, नगर विकास विभाग, सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग आणि महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या गटाने या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करावा आणि शर्मा-वर्मा कुटुंब करारातील सर्व शर्ती किंवा शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने घातलेल्या सुधारीत शर्ती किंवा दोन्ही योजनांमधील काही शर्ती प्रस्तावित कराराबाबत लागू कराव्यात किंवा कसे ते पहावे. प्राधिकरणाने अशीही इच्छा व्यक्त केली की, प्रस्तावित करारात, ज्याप्रमाणे केंद्र सरकारच्या जमिनविषयक आवश्यकता समाविष्ट करण्यात आल्या त्याच धर्तीवर, राज्य शासन, त्याचे उपक्रम व स्थानिक प्राधिकरण यांच्या जमिनविषयक आवश्यकता समाविष्ट कराव्यात काय याबाबतही या गटाने विचार करावा. गटाचा अहवाल प्राप्त होईपर्यंत यापूर्वी घेतलेला निर्णय प्रतिक्षाधीन ठेवण्यात यावा असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले.

वरील बाबीवर अवलंबून, प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

...३/-

बाब क्र. ३ : विशिष्ट प्रकारच्या विकास कार्यासाठी पूर्व परवानगी आवश्यक असल्याबद्दल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ अन्वये प्राधिकरणाने काढलेली अधिसूचना

प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर, प्राधिकरणाने ३० मे, १९९२ रोजीच्या आपल्या मागील बैठकीत ठराव क्र. ५१५ अन्वये यापूर्वी घेतलेला निर्णय कायम केला आणि तदनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ अन्वये काढलेली सध्याची अधिसूचना ताबडतोब पूर्णत: विखंडीत व निरसित करण्याचा निर्णय घेतला. [जोडपत्र]

बाब क्र. ४ : माहीम निसर्ग उद्यानाच्या व्यवस्थापन व देखभालीसाठी योजना - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेबरोबर करावयाच्या कराराच्या मसुद्यास मान्यता.

प्राधिकरणाने कराराच्या मसूद्यावर विचार केला आणि तो मान्य करून त्याप्रमाणे पुढील ठराव मंजूर केला:-

ठराव क्र. ५२० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीच्या जोडपत्र-२ प्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेबरोबर करावयाच्या कराराचा मसूदा आणि त्यात दिलेल्या सर्व अटी व शर्ती यांस प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७अ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त करारावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने सही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत केले आहे."

बाब क्र. ५ : मुंबई पार बंदर जोडरस्ता प्रकल्प :

निमंत्रणावरून उपस्थित असलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे तंत्रिक सल्लागार श्री. एन. व्ही. मेराणी यांनी, मुंबई पार बंदर जोडरस्ता प्रकल्पाच्या दक्षिणेकडील जोडरस्त्याचा अभ्यास हाती घेण्याची आवश्यकता आहे हे स्पष्ट केले. चर्चेनंतर प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि

विचारार्थ विषयाचा मसूदा तयार करण्यासाठी स्थापन करावयाच्या तज्ञ समितीने दोन महिन्यांच्या आत तो मसूदा प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करावा अशी शर्त घातली. प्राधिकरणाने त्या-प्रमाणे पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२१ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्रस्तावित केल्या-प्रमाणे शक्यता अभ्यासाबाबतचा प्रस्ताव हाती घेण्यात यावा व त्यासाठीचा खर्च सुरूवातीला मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात यावा व त्यानंतर तो प्रकल्प खर्चात समायोजित करण्यात यावा किंवा योग्य त्या संस्थेकडून त्यासाठी अनुदान मिळवावे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्रा. यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे तज्ञ समिती नेमणे तसेच अभ्यास पार पाडण्याकरिता इतर पाठपुराव्याची कामे करणे यासहीत पुढील कार्यवाही हाती घेण्यात प्राधिकृत करण्यात येत आहे. मात्र शर्त अशी की तज्ञ समिती दोन महिन्यांच्या आत विचारार्थ विषय प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करील."

बाब क्र. ६ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या "जी" व "जीएन" ब्लॉकमधील जमिन नेमून देण्याची कार्यपध्दती - भाडे अधिमूल्य निर्धारण

बाब टिप्पणीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र. ७ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "इ" ब्लॉकमधील निवासी भूखंड आर-१४ व आर-१५ यांचे वितरणाबाबत

चर्चेअंती, प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण [जमिनीची विल्हेवाट] विनियम १९७७ या विनियम क्र. ४ च्या अधीन राहून वांद्रा-कुर्ला संकूलातील "इ" ब्लॉकमधील निवासी भूखंड आर-१४ व आर-१५ यांची किंमत ही १२,१००/- प्रती चटई क्षेत्र चौ. मी. पेक्षा कमी नाही व अन्य प्रमाणभूत शर्ती व अटींना अधीन राहून शासकीय विभाग व सार्वजनिक उपक्रमांना वितरण करण्यास ..... ५/-

महानगर आयुक्त यांना हे प्राधिकरण प्राधिकृत करीत आहे."

"यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, भूखंड अदा करण्यात येण्याच्या बरोबर भाडेपट्टा करावयाच्या करारनाम्याच्या नमुन्यात आणि भाडेपट्टी विलेखयात आवश्यक ठरल्यास, उचित दुरुस्त्या करण्यास महानगर आयुक्त, मुं. म. प्र. वि. प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ८ : वांद्रे-कुर्ला संकूल अधिसूचित क्षेत्रात संमत विकास नियंत्रण नियमावलीचे फेरबदल

बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलासाठी सर्वसाधारण विकास नियंत्रण विनियमाच्या विनियम क्र. ४ मध्ये खंड [३] ची भर घालण्याचा प्रस्ताव पुढील फेरबदलांसह प्राधिकरणाने मान्य केला :

[१] प्राधिकरण जे काही अधिमूल्य निर्धारीत करील त्याचा भरणा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे करण्यात आला पाहिजे. त्या रकमेपैकी प्रत्येकी १/३ रक्कम राज्य शासनास व बृहन्मुंबई महानगर-पालिकेस देण्यात यावी. उरलेली १/३ रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे ठेवून घेण्यात यावी असे ठरविण्यात आले.

[२] नियोजन समितीचा अहवाल, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे राज्य शासनास थेट सादर करण्याऐवजी उक्त अहवाल प्रथम प्राधिकरणाकडे विचारार्थ सादर करण्यात येईल असे देखील ठरविण्यात आले.

तदनुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण हे, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०[१][क] अन्वये वांद्रे-कुर्ला संकूल अधिसूचित क्षेत्रासाठी नेमलेले विशेष नियोजन प्राधिकरण असल्या-कारणाने उक्त अधिनियमाचे कलम ४०[३] आणि कलम ११३ [अ] [८] व कलम ३७ अन्वये आपल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण विनियमांच्या विनियम क्र. ४ मध्ये, बाब टिप्पणीत अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या खंड [३] ची भर घालण्यास त्याच्या परंतुकामध्ये पुढीलप्रमाणे फेरबदलास अधीन राहून मान्यता देत आहे :-

'परंतू, शैक्षणिक, वैद्यकीय आणि संस्थात्मक इमारतींच्या बाबतीत अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकास मुभा दिल्याच्या प्रकरणी, प्राधिकरणाकडून

ठरविले जाईल असे, अधिमूल्य प्राधिकरणास देण्यात येईल. या रकमेपैकी प्रत्येकी १/३ रक्कम राज्य शासनास व बृहन्मुंबई महानगरपालिकेस द्यावयाची असून उरलेली १/३ रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ठेवून घेईल."

"असाही ठराव करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील आपल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण, राजपत्रात आणि "टाईम्स ऑफ इंडिया" व "लोकसत्ता" या दोन स्थानिक वृत्तपत्रांत एक नोटीस प्रसिध्द करून अशा नोटिशीच्या तारखेपासून जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत लोकांकडून आक्षेप व सूचना मागवण्यात मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण मुं. म. प्र. वि. प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७[अ] आणि उक्त अधिनियमाचे कलम १३९ खालील आपल्या अधिकारांचा वापर करून, महानगर आयुक्त यांना पूर्वगामी खंडानुसार नोटीस प्रसिध्द करण्यास प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण उक्त अधिनियमाच्या कलम १५१ [३] खालील आपल्या अधिकारांचा वापर करून असा आदेश देते की, महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला वरिष्ठ नियोजकापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी याबाबत प्राप्त होतील अशा आक्षेपांचा/सूचनांचा विचार करील आणि असे आक्षेप/सूचना प्रस्तुत करणा-या व्यक्तिंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आपला अहवाल प्रस्तावित फेरबदलांसह, उक्त अधिनियमाच्या कलम ३७च्या अर्थानुसार अंतिम मंजूरीसाठी कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणास सादर करील."

बाब क्र. ९ : वांद्रे-कुर्ला समूहातील "ए" ब्लॉकमध्ये [शहर सर्वेक्षण क्र. ए-७९१ वांद्रे पुन:प्रापण] लीलावती किर्तीलाल मेहता मेडिकल ट्रस्टच्या प्रस्तावित हॉस्पिटल इमारतीस अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक ०.५ इतका देणेबाबत.

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र. १० : वडाळा भारवाहक तळामधील स्थावर मालमत्तेची विल्हेवाट करण्यासाठी महानगर आयुक्तांना शक्तीचे प्रत्यायोजन करणे.

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचार केला आणि वडाळा भारवाहक टप्पा-१ मध्ये मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाने बांधलेल्या ए१, बी१, बी२ आणि

...७

डी२ या चार इमारतीतील रिकामे बांधीव क्षेत्र विल्हेवाटीचे आता महानगर आयुक्तांकडे सोपविण्याचे अधिकार खालील शर्तीवर देण्याचे ठरविले. यापूर्वी वरील अधिकार आपखी इतर बाबी बरोबर मुं.म.प्र.वि.प्रा.भारवाहक तळ मालमत्ता समितीकडे सोपविले होते :-

१] महानगर आयुक्त, त्यांनी घेतलेले निर्णय, अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी ते मान्य केल्यानंतर अंमलात येतील, आणि

२] महानगर आयुक्त यांनी घेतलेले आणि तदनंतर प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी मान्य केलेले सर्व निर्णय प्राधिकरणास त्याच्या पुढील बैठकीच्या वेळी कळविण्यात येतील.

वडाळा भारवाहक तळामधील उरलेल्या भूखंडांची विल्हेवाट प्राधिकरणाच्या पूर्व-मान्यतेने करण्यात येईल असे ठरविण्यात आले.

पूर्वगामी निर्णय विचारात घेऊन, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण भारवाहक तळ स्थावर मालमत्ता समिती स्थापन करण्यासंबंधीचे प्रस्ताव रद्द करण्याचा आणि मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या योग्य अधिकाऱ्यांची अंतर्गत समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२४ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुं.म.प्र.वि.प्रा.अधिनियम १९७४ चे कलम ९ चे उपकलम [१] व मुंबई सर्वसाधारण खंड अधिनियम, १९०४ चे कलम २१ अन्वये तसेच या संबंधात देण्यात आलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण भारवाहक तळ स्थावर मालमत्ता समितीच्या नेमणूकीचा आदेश रद्द करीत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या कलम ४६क ~~कलम~~ कलम ४अ[१] व ४अ[२][अ] मधील तरतुदीनुसार प्राधिकरण खालील अटींच्या अधीन राहून वडाळा भारवाहक तळामधील प्राधिकरणाने बांधलेल्या ए-१, बी-१, बी-२ व डी-२ या चार इमारतीमधील रिकाम्या बांधीव जागेची विल्हेवाटीच्या सर्व शक्तींचे प्रत्यायोजन करीत आहे.

[१] महानगर आयुक्तांनी घेतलेले निर्णय हे प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी दिलेल्या मंजूरीनंतरच कार्यान्वित होतील व

[२] अशाप्रकारे महानगर आयुक्तांनी घेतलेले व प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी मंजूर केलेले निर्णय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीपुढे ठेवण्यात येतील.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीचे वितरण] विनियम, १९७७ खालील तरतुदीनुसार वर उल्लेखिलेल्या

[कृ. मा. प.]

चार इमारतींमधील रिकाम्या बांधीव जागेचे विल्हेवाटीसाठी, महानगर आयुक्तांना सहाय्य करण्याकरिता प्राधिकरणाच्या योग्य अधिका-यांची अंतर्गत समितीची [ In-house Committee ] नेमणूक करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ११ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १९९१-९२ सालचे वार्षिक लेखे

प्राधिकरणाने वार्षिक लेखे व त्यावरील मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला. :-

ठराव क्र. ५२५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास" प्राधिकरणाच्या सन १९९१-९२ सालाच्या वार्षिक लेख्यांना व त्यावरील मुख्य लेखाधिकारी यांचे अहवालाला प्राधिकरण आपली मान्यता देत आहे."

बाब क्र. १२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील विभाग प्रमुखांच्या वेतनश्रेणीत सुधारणा

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५२६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, आपल्या दिनांक ३१ मार्च, १९९० च्या ठराव क्र. ४२३ अन्वये दिलेल्या मंजूरीत आंशिक फेरबदल करुन प्राधिकरण याद्वारे, उक्त ठरावातील वेतनश्रेणी सुधारणेच्या इतर शर्ती न बदलता, शासनाने मान्य केल्याप्रमाणे मुख्य अभियंता व विभाग प्रमुख या पदांसाठी, रु. ४५००-५७०० ऐवजी रु. ५१००-६३०० या सुधारीत वेतनश्रेणीस प्रस्ताविल्याप्रमाणे मंजूरी देत आहे."

बाब क्र. १३ : मुंबई महानगरपालिकेने मुंबई एज्युकेशनल ट्रस्टला पोटभाडेपट्ट्याने नेमून दिलेला वांद्रे-रेक्लमेशनमधील भूखंड क्र. ए/७९१ चा मार्गीकरण खर्च [ Channelisation charges ] देणे.

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे, मुंबई एज्युकेशनल ट्रस्टला मार्गीकरण खर्च रु. ११,२९,८००/- [रुपये अकरा लाख एकोणतीस हजार आठशे फक्त] १० समान हप्त्यांत भरण्याची परवानगी

देण्यास पुढील शर्तीवर मान्यता देत आहे :-

[१] मार्गीकरण खर्चाची रक्कम ५ [पाच] वर्षात भरल्यास उपरोक्त ट्रस्टला कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. आणि

[२] पहिल्या ५ [पाच] वर्षानंतर अदत्त रकमेवर प्रतिवर्ष ६.५ टक्के दराने व्याज आकारले जाईल."

बाब क्र. १४ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील सुमारे १५,००० चौ.फूट वाणिज्यिक जमीन भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळास [ ICICI ] नेमून देणे.

---

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्रा.अधिनियम, १९७४चे कलम ३, पोटकलम [२] आणि मुं.म.प्र.वि.प्रा. [जमिनीची विल्हेवाट] विनियम, १९७७ या विनियम ४ [तीन] खाली प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, या जमिनीचे सुमारे ३०,००० चौ.फू. बांधीव क्षेत्र किंवा मोजणीनंतर प्रत्यक्ष आढळून येईल असे क्षेत्र भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळास उपरोक्त विनियमांच्या नमूना "डी" मधील भाडेपट्टा करार करून दिल्याच्या तारखेपासून ८० [ऐंशी] वर्षाच्या भाडेपट्टयाने, पुढील अटी व शर्तीच्या अधीनतेने नेमून देण्याचा प्रस्ताव मान्य करीत आहे :-

[१] भाडे अधिमूल्य प्रति चटईक्षेत्र निर्देशांक चौ.फूटास रू.१५,०००/- इतके राहील.

[२] भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ, बाब टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडे अधिमूल्य देईल, आणि

[३] हा देकार मुं.म.प्र.वि.प्रा. [जमिनीची विल्हेवाट] विनियम, १९७७ च्या अधीन राहील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना हा ठराव अंमलात आणण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे नमुना "डी" मधील भाडेपट्टा कराराच्या नमुन्यात व नमूना "ई" मधील भाडेपट्टा विलेखात योग्य ते बदल करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

[कृ.मा.प.]

बाब क्र. १५ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील व्यापारी भूखंड राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँकेस [नाबार्ड] नेमून देणे.

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५२९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ३, पोटकलम [२] आणि मुं. म. प्र. वि. प्रा. [जमिनींची विल्हेवाट] विनियम, १९७७ या विनियम ४ [तीन] खाली प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, या जमिनीचे बांधीव क्षेत्र सुमारे २३,२३५ चौ. फूट किंवा मोजणीनंतर प्रत्यक्ष आढळून येईल असे क्षेत्र नाबार्डला उपरोक्त विनियमांच्या नमूना "डी" मधील भाडेपट्टा करार करून दिल्याच्या तारखेपासून ८० [ऐंशी] वर्षांच्या भाडेपट्टयाने, पुढील अटी व शर्तींच्या अधीनतेने नेमून देण्याचा प्रस्ताव मान्य करीत आहे :-

[१] भाडे अधिमूल्य प्रति चटईक्षेत्र निर्देशांक चौ. फूटास रु. १५,०००/- इतके राहील,

[२] नाबार्ड बाब टिप्पणीच्या परिच्छेद ३ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडे अधिमूल्य देईल; आणि

[३] हा देकार मुं. म. प्र. वि. प्रा. [जमिनींची विल्हेवाट] विनियम, १९७७ च्या अधीन राहील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना हा ठराव अंमलात आणण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे नमूना "डी" मधील भाडेपट्टा कराराच्या नमुन्यात व नमूना "ई" मधील भाडेपट्टा विलेखात योग्य ते बदल करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभेचे कामकाज समाप्त झाले.

-----

जोडपत्र

# MINUTES OF THE 65TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

| | | |
|---|---|---|
| DATE | : | 11TH AUGUST, 1992 (TUESDAY) |
| TIME | : | 10.30 A.M. |
| PLACE | : | Committee Room (Room No.313) in the office of the Hon'ble Minister for Urban Development, Mantralaya. |

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Vasant Chavan, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof.Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri R.T. Kadam, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Smt. Nita Ashwin Naik, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri S.G. Kale, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to the Government of Maharashtra, Urban Development Department. | - Member |
| Shri Navin Kumar, Secretary to Government of Maharashtra, Housing & Special Assistance Deptt. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

As the quorum was not present (2 non-official members) the meeting adjourned. As provided under Rule 12 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975, it was decided to meet after half an hour.

-.-.-.-.-.-.-

# MINUTES OF THE ADJOURNED 65TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

| | | |
|---|---|---|
| DATE | : | 11TH AUGUST, 1992 (TUESDAY) |
| TIME | : | 11.00 A.M. |
| PLACE | : | Committee Room (Room No.313) in the office of the Hon'ble Minister for Urban Development, Mantralaya. |

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Vasant Chavan, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof.Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri R.T. Kadam, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Smt. Nita Ashwin Naik, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Subhash Mayekar, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri R.R. Singh, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri S.G. Kale, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to the Government of Maharashtra, Urban Development Department. | - Member |
| Shri Navin Kumar, Secretary to the Govt. of Maharashtra, Housing & Special Assistance Deptt. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

At the outset, the Chairman cordially welcomed Smt. Nita Ashwin Naik, Shri Subhash Mayekar and Shri R.R. Singh, Councillors, Bombay Municipal Corporation, who were inducted as new Members of the Authority.

The Chairman also welcomed Shri Navin Kumar who was attending the meeting of the Authority for the first time after he was appointed as Secretary to Government, Housing & Special Assistance Department.

The Authority then proceeded with the business on the Age

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the last (64th) meeting of the Authority.

The minutes were confirmed.

ITEM NO. 2 : Action taken on the minutes of the last (64th) meeting of the Authority.

While considering the action taken report in respect of Item No.6 viz. "Approval to enter into Tripartite Agreement with the Government in UDD and the Landholders, M/s. Mukand Iron & Steel Works Ltd. (now renamed as Mukand Ltd.) in respect of the land held by them at Pawai", the Authority desired that a Group consisting of the Secretary-I, U.D.; Secretary, Housing & Special Assistance Department and the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay shall consider the issue in all its perspectives and see whether all the conditions of Sharma-Varma family agreement or whether revised conditions imposed by the Government in Housing & Special Assistance Department or some of the conditions from both the schemes should be made applicable in respect of the proposed agreement. The Authority also desired that the Group should consider whether requirement of land of the State Government, its Undertakings and Local Authorities to be incorporated in the proposed agreement, on the same lines as land requirements of the Central Government are incorporated therein. Pending receipt of report of the Gro the Authority desired that the decision already taken shall be kept in await.

Subject to the above, the action taken report was noted by the Authority.

ITEM NO. 3 : Notification issued by the BMRDA under Section 13 of the BMRDA Act, 1974 requiring prior permission for certain types of developments.

After a prolonged discussion, the Authority confirmed the decision already taken at its last meeting held on

........3/-

30th May, 1992, vide Resolution No. 515 and accordingly decided to rescind and repeal in its entirety the present Notification issued under Section 13 of the BMRDA Act, 1974, with immediate effect (Annexure).

ITEM NO. 4 : Scheme for Management and Maintenance of Mahim Nature Park - Approval to the Draft Agreement to be entered into by the BMRDA with the Maharashtra Nature Park Society.

The Authority considered the Draft Agreement and approved the same and accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 520 :

" RESOLVED THAT the Authority hereby approves the Draft Agreement to be entered into by the BMRDA with the Maharashtra Nature Park Society as per Annexure-II to the Item Note and all the terms & Conditions set out therein.

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised, as provided under Section 7A of the BMRDA Act, 1974 to sign the said agreement on behalf of the BMRDA."

ITEM NO. 5 : Bombay Trans Harbour Link Project.

Shri N.V. Merani, Technical Adviser, B.M.R.D.A., who was present by invitation, explained the necessity of taking up the study of Southern Link of the Bombay Trans Harbour Link (BTHL) Project. After discussions, the Authority approved the proposal, contained in the Item Note with the condition that the Expert Committee to be constituted for drafting the Terms of Reference (TOR), shall submit the TOR within 2 months for the approval of the Authority. The Authority accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 521 :

" RESOLVED THAT the Authority approves the proposal to take up the feasibility study as proposed by intially spending BMRDA's funds to be adjusted against the project cost or approach to a suitable agency for grant assistance.

.......4/-

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to take further action including constitution of an Expert Committee, as proposed, as well as taking up further follow up actions as may be necessary for carrying out the study, subject to the condition that Expert Committee shall submit the Terms Of Reference (TOR) within 2 months for the approval of the Authority."

<u>ITEM NO. 6</u> : <u>Allotment of land in 'G' & 'GN' Blocks in Bandra-Kurla Complex - Procedure for allotment of - Determination of lease premium.</u>

Consideration of the Item was deferred.

<u>ITEM NO. 7</u> : <u>Allotment of Residential Plots No. R-14 & R-15 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.</u>

After discussion, the Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

<u>RESOLUTION NO. 522</u> :

" RESOLVED THAT the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to dispose of Residential Plots No. R-14 & R-15 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex, to any Government Department or Public Sector Undertaking, in terms of Regulation No.4(iii) of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977, with a condition that the price shall not be less than Rs.12,100/- per FSI Sq.Mtr. and on other standard terms and conditions.

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable amendments, if necessary in the form of Agreement to Lease and Lease Deed to be executed with the allottee."

<u>ITEM NO. 8</u> : <u>Modification to the D.C. Regulations of Bandra-Kurla Complex Notified Area.</u>

The Authority approved the proposal to add Clause (iii) to Regulation No.4 of the General Development Control

Regulations for Bandra-Kurla Complex, as proposed in the Item Note with the following modifications :-

1) It was decided that the premium, if any, determined by the Authority shall be paid to the BMRDA, out of which 1/3rd amount each shall be payable to the State Government and the Municipal Corporation of Greater Bombay (MCGB) and the remaining 1/3rd amount shall be retained by the BMRDA; and

2) It was also decided that the report of Planning Committee shall, in the first instance, be submitted to the Authority for consideration instead of directly submitting the said report to the State Government as proposed in the Item Note.

The Authority, accordingly, passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 523 :

" RESOLVED THAT the Authority being the Special Planning Authority for the Bandra-Kurla Complex Notified Area, appointed under Section 40(1)(c) of the MR&TP Act, 1966 do in exercise of its powers, under Section 40(3) read with Section 113(A)(8) jointly with Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf approved of addition of Clause (iii) to Regulation No.4 of the General Development Control Regulations for Bandra-Kurla Complex, as more particularly described in the Item Note, subject to modification that proviso thereto shall read as follows :-

' Provided that in the case of additional FSI allowed in respect of educational, medical institutions and the Institutional Buildings, premium if any, as may be determined by the Authority shall be paid to the Authority. Out of this amount 1/3rd amount each shall be payable to the State Government and the Municipal Corporation of Greater Bombay and the remaining 1/3rd amount shall be retained by the BMRDA.'

" RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf approve of a notice being published in the official Gazette and in two local newspapers being 'The Times of India' and the 'Loksatta' for inviting objections and suggestions from the public with respect to such modifications not later than one month from the date of such a notice.

" RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7(A) of the BMRDA Act, 1974 authorises the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

" RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner or the officer not below the rank of Senior Planner nominated by the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf and after giving hearing to persons presenting such objections/suggestions shall submit his report to the Authority alongwith proposed modifications for being processed for final sanction in terms of Section 37 of the said Act."

<u>ITEM NO. 9</u> : Grant of additional FSI 0.5 for proposed Hospital building bearing CTS No. A-791 of Bandra Reclamation, Bandra (West), 'A' Block, Bandra-Kurla Complex for Leelavati Kirtilal Mehta Trust.

Consideration of the Item was deferred.

<u>ITEM NO.10</u> : Delegation of powers regarding disposal of immovable property in the Truck Terminal at Wadala to the Metropolitan Commissioner, etc

The Authority considered the Item Note and decided to delegate the final powers of disposal of the vacant built-up space in 4 buildings viz. A1, B1, B2 and D2 constructed by BMRDA in Phase-I of Truck Terminal, Wadala, which were inter-alia delegated by the Authority to the BMRDA Truck Terminal Immovable Property Committee, to the Metropolitan Commissioner. The delegation was made on the following conditions :-

1) The Metropolitan Commissioner shall implement the

decisions taken by him after these decisions are further approved by the Chairman, BMRDA.; and

2) All the decisions taken by the Metropolitan Commissioner and further approved by the Chairman of the Authority shall be reported to the Authority at its next meeting.

As regards remaining plots in the Truck Terminal, it was decided that these plots shall be disposed of with the prior approval of the Authority. In view of the foregoing decisions, proposals to revoke orders regarding constitution of the BMRDA Truck Terminal Immovable Property Committee and constitution of in-house Committee consisting of suitable BMRDA Officers, were approved. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 524 :

" RESOLVED THAT in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 9 read with Section 21 of the Bombay General Clauses Act, 1904 and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby revokes its order regarding appointment of the Bombay Metropolitan Region Development Authority Truck Terminal Immovable Property Committee.

" RESOLVED FURTHER THAT as provided under Section 46C of the BMRDA Act read with Section 4A(1)& 4A(2)(a) of the Act, the Authority hereby delegates to the Metropolitan Commissioner all the powers to dispose of the vacant built-up space in four buildings constructed by BMRDA viz. A1, B1, B2 & D2, in Phase-I of Truck Terminal, Wadala, subject to the following conditions :-

1) That the Metropolitan Commissioner shall implement the decisions taken by him after these decisions are further approved by the Chairman, BMRDA; and

2) That all the decisions taken by the Metropolitan Commissioner and further approved by the Chairman of the Authority shall be reported to the Authority at its next meeting.

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to appoint an in-house Committee consisting of suitable BMRDA officers to assist him in his task of Disposal of built-up space in the four buildings mentioned above as per BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977."

ITEM NO.11 : Annual Accounts of BMRDA for the year 1991-92.

The Authority approved the Annual Accounts and report of the Chief Accounts Officer thereon and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 525 :

" RESOLVED THAT the Authority hereby accords its approval to the Accounts of the Authority for the year 1991-92 and to the Report of the Chief Accounts Officer thereon."

ITEM NO.12 : Revision of pay-scale of Chiefs of Divisions in B.M.R.D.A.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 526 :

" RESOLVED THAT in partial modification of sanction accorded under its Resolution No.423, dated 31st March, 1990, the Authority hereby accords sanction to revise pay-scale of the posts of the Chief Engineer and Chiefs of Divisions to Rs. 5100-6300 instead of Rs. 4500-5700 as agreed to by the Government, other conditions of the revision of pay-scale contained in the said Resolution remaining unchanged, as proposed."

ITEM NO.13 : Plot of land No. A/791 in Bandra Reclamation allotted on sub-lease to the Mumbai Educational Trust by the Bombay Municipal Corporation - Channelisation charges - Payment of -

The Authority approved the proposal contained in

........9/-

the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 527 :

" RESOLVED THAT the Authority hereby approves that the Mumbai Educational Trust be allowed to pay the Channelisation Charges amounting to Rs. 11,29,800/- (Rupees Eleven Lakhs Twenty-Nine Thousand and Eight Hundred Only) in 10 equal annual instalments on the following conditions :-

1) That the above mentioned trust shall not be charged any interest if the amount of the Channelisation Charges is paid within 5 (Five) years; and

2) That interest at the rate of 6.5% per annum be charged to the Trust on the outstanding amount after the first 5 (Five) years."

ITEM NO.14 : Allotment of commercial land admeasuring about 15,000 Sq.Mtrs. in 'G' Block of the Bandra-Kurla Complex to the Industrial Credit & Investment Corporation of India Limited (ICICI).

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 528 :

" RESOLVED THAT in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, read with Regulation 4(iii) of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to allot the plot of land so as to have a built-up area of about 30,000 Sq.Mtrs. or the actual area that will be found after measurement of this land to the Industrial Credit & Investment Corporation of India Limited (ICICI), on lease of 80 (Eighty) years, from the date of execution of the Agreement to Lease in Form 'D' of the above said Regulations, subject to the following terms and conditions :-

1) That the lease premium will be Rs.15,000/- per FSI Sq.Mtr.;

2) That the ICICI will pay the lease premium in terms of para.5 of the Item Note; and

3) That the offer will be subject to BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977.

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to implement the Resolution and make suitable changes in the form of Agreement to Lease in Form 'D' and Lease Deed in Form 'E' as may be required."

ITEM NO.15 : Allotment of a Commercial plot in 'G' Block of the Bandra-Kurla Complex, to National Bank for Agriculture and Rural Development (NABARD).

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 529 :

" RESOLVED THAT in exercise of powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, read with Regulation 4(iii) of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to allot the plot of land so as to have the built-up area of about 23,235 Sq.Mtrs. or the actual area that will be found after measurement to the National Bank for Agriculture and Rural Development (NABARD) on 80 (Eighty) years lease, from the date of execution of the Agreement to Lease in Form 'D' of the above said Regulations subject to the following terms and conditions :-

1) That the lease premium will be Rs. 15,000/- per FSI Sq.Mtr.;

2) That the NABARD will pay the lease premium in terms of para.3 of the Item Note and

3) That the offer is subject to the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977.

" RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to implement the Resolution and

.........11/-

make suitable changes in the Form of Agreement to Lease in Form 'D' and Lease Deed in Form 'E' as may be required."

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-

Annexure ....

ANNEXURE
जोडपत्र

111

क्र. ५१

रजिस्टर्ड नं. एम.एच./बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, ऑगस्ट २१, १९९२/श्रावण ३०, शके १९१४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-क

...राष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व ...ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक ...म व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, संचालक (दारूबंदी ...उत्पादन शुल्क), जिल्हा दंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, ...णूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी, यांनी तयार ...के वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

### BY THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

Plot Nos. C-14 & C-15, 'E' Block, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Bombay 400 051

...A/RDM/1092/910.—In exercise of the powers conferred under sub-...n (*l*) of section 13 of the Bombay Metropolitan Region Development ...rity Act, 1974 (Mah. IV of 1975) read with section 21 of the Bombay ...l Clauses Act, 1904 (Bom. I of 1904) and all other powers enabling ...his behalf, the Metropolitan Authority hereby rescinds and repeals its ...cation No. A/RDM/1091/910, dated 10th October 1991, with ...diate effect.

P. SUBRAHMANYAM,
Metropolitan Commissioner.

...bay :
...d the 21st August 1992.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

प्राधिकरणाचे अधिकारी